॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४–२५/३०९ दिनांक ०७/०१/२०२५

परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय:— नेतृत्व कौशयल्य विकास कार्यक्रमामध्ये सहभागी होणे बाबत.**
**संदर्भ:—** चंद्रकांत गंदेवार, यिन अधिकारी, सकाळ माध्यम समुह यांचे दि. निरंक रोजीचे निवेदन.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय निवेदनान्वये भारत हे तरूणांचे राष्ट्र आहे. जेव्हां तरूणांना कृती करण्यास प्रवृत्त केले जाते. तेंव्हा त्यांच्याकडे जग बदलण्याची शक्ती आणि गतिशीलता असते. या उद्देशाने, सकाळ माध्यम समुहाचे व्यवस्थापकीय संचालक अभिजित पवार यांनी सकाळ माध्यम समुहाच्या "डिलिव्हरिंग चेंज फाउंडेशन" (DCF) अंतर्गत यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (YIN) सुरू केले. यिन हे एक व्यासपीठ आहे. जिथे हजारों तरूण एकत्र येतात आणि राष्ट्र परिवर्तन प्रकल्प, सामाजिक उपक्रम, मनोरंजक उपक्रम आणि कार्यक्रम आणि समाजसेवा करतात. यिन सध्या महाराष्ट्रातील ३६ जिल्हे, ५००० पेक्षा जास्त महाविद्यालयामध्ये पसरले आहे आणि लाखो विद्यार्थ्यांचा सहभाग आहे आणि वेगाने वाढत आहे. दरवर्षी नेतृत्त्व कौशयल्य विकास कार्यक्रम राबविल्या जातो. (यिन च्या निवडणूका) महाविद्यालयीन स्तरावर प्रतिनिधी यिन अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडला जातो. यात निवडून आलेल्या जिल्हयातील सर्व महाविद्यालयातून जिल्हाध्यक्ष व जिल्हा उपाध्यक्ष आणि तालुका अध्यक्ष यांची निवड केली जाते. नंतर महाराष्ट्रातून यिन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची निवड केली जाते. तसेच संपुर्ण महाराष्ट्राचे शॅडो मंत्रिमंडळ तयार केले जाते. या द्वारे महाराष्ट्रात महाविद्यालयीन युवक–युवती करिता वेगवेगळया कार्यक्रमांचे आयोजन होत असते. संपुर्ण महाराष्ट्रात या वर्षी होणा–या राज्यस्तरीय नेतृत्त्व विकास कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील २ विद्यार्थी व २ विद्यार्थीनींना ऑनलाईन होणा–या यिन निवडणूकीमध्ये सहभागी होण्यास कळविण्यात आले आहे. तसेच महाविद्यालयातून खालील गोष्टींना परवानगी मिळण्याबाबत विनंती केली आहे.

1) महाविद्यलयात ऑनलाईन यिन नेतृत्त्व विकास कार्यक्रम राबविण्या करिता.
2) महाविद्यालयातून किमान ४ उमेदवार नावे. (प्रत्येक उमेदवारास ५००/– रूपये फी असेल)
3) महाविद्यालयातून एका प्राध्यापकाचे नाव निवडणूक अधिकारी म्हणून द्यावे.
4) म्हाविद्यालयात विविध उपक्रम राबविण्यासाठी किमान १० विद्यार्थ्यांचा यिन क्लब तयार करून आर्थिक साक्षरता, उद्योजगकता कौश्यल्य, सृजनशील विचार, भावनिक आणि मानसिक आरोग्य, सेवा, योगा आणि ध्यान या मुलतत्वांना धरून उपक्रम, यिन संवाद घेण्याकरिता परवानगी देण्याबाबत कळविले आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, संपुर्ण महाराष्ट्रात या वर्षी होणा–या राज्यस्तरीय नेतृत्त्व विकास कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील २ विद्यार्थी व २ विद्यार्थीनींना ऑनलाईन होणा–या यिन निवडणूकीमध्ये सहभागी होण्यास व उपरोक्त नमुद ४ गोष्टींना संलग्नीत महाविद्यालयानी परवानगी देण्यात यावी तसेच आपल्या महाविद्यालयातून एका प्राध्यापकांचे नाव निवडणूक अधिकारी म्हणून कळविण्यात यावे, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती

सकाळ
SAKAL MEDIA PRIVATE LIMITED
Registered Office :
595, Budhwar Peth, Pune 411002
Phone No : 020-24405500/66035500
Fax No : 020-24450583
CIN : U22219PN2017PTC169258
Web site : www.esakal.com
E-Mail : sakal@esakal.com

दिनांक : ____________

प्रति,

मा. मल्लिकार्जुन करजगी सर,
संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड.

**विषय : महाविद्यालय स्तरावर नेतृत्व कौशल्य विकास कार्यक्रम मध्ये नांदेड, हिंगोली, परभणी आणि लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे बाबत.**

महोदय,

भारत हे तरूणांचे राष्ट्र आहे. जेव्हा तरुणांना कृती करण्यास प्रवृत्त केले जाते, तेव्हा त्यांच्याकडे जग बदलण्याची शक्ती आणि गतिशीलता असते. या उद्देशाने, सकाळ माध्यम समूहाचे व्यवस्थापकीय संचालक अभिजित पवार यांनी सकाळ माध्यम समूहाच्या "डिलिव्हरिंग चेंज फाउंडेशन" (DCF) अंतर्गत यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (YIN) सुरू केले. यिन हे एक व्यासपीठ आहे, जिथे हजारो तरुण एकत्र येतात आणि राष्ट्र परिवर्तन प्रकल्प, सामाजिक उपक्रम, मनोरंजक उपक्रम आणि कार्यक्रम आणि समाजसेवा करतात.

यिन सध्या महाराष्ट्रातील 36 जिल्हे, 5000 पेक्षा ज्यास्त महाविद्यालयामध्ये पसरले आहे आणि लाखो विद्यार्थ्यांचा सहभाग आहे आणि वेगाने वाढत आहे. दरवर्षी नेतृत्व कौशल्य विकास कार्यक्रम राबवला जातो. (यिन च्या निवडणूका) महाविद्यालयीन स्तरावर प्रतिनिधी यिन अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडला जातो. यात निवडून आलेल्या जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातून जिल्हाध्यक्ष व जिल्हा उपाध्यक्ष आणि तालुका अध्यक्ष यांची निवड केली जाते. नंतर महाराष्ट्रातून यिन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची निवड केली जाते. तसेच संपूर्ण महाराष्ट्राचे शॅडो मंत्रिमंडळ तयार केले जाते. या द्वारे महाराष्ट्रात महाविद्यालयीन युवक-युवती करिता वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन होत असते. संपूर्ण महाराष्ट्रात या वर्षी होणाऱ्या राज्यस्तरीय नेतृत्व विकास कार्यक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील 2 विद्यार्थी व 2 विद्यार्थिनींना ऑनलाईन होणाऱ्या यिन निवडणुकीमध्ये सहभागी करून घेण्यात यावे. ही विनंती.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**
**चंद्रकांत गंदेवार, यिन अधिकारी नांदेड, हिंगोली, परभणी - 9130668767**
**अमर साखरे, यिन अधिकारी लातूर - 9665128871**

**महाविद्यालयातून खालील गोष्टींना परवानगी मिळावी.**

* महाविद्यालयात ऑनलाईन यिन नेतृत्व विकास कार्यक्रम राबविण्याकरीता.
* महाविद्यालयातून किमान 4 उमेदवार नावे. (प्रत्येक उमेदवारास 500/- रुपये फी असेल)
* महाविद्यालयातून एका प्राध्यापकांचे नाव निवडणूक अधिकारी म्हणून द्यावे.
* महाविद्यालयात विविध उपक्रम राबवण्यासाठी किमान 10 विद्यार्थ्यांचा यिन क्लब तयार करून आर्थिक साक्षरता, उद्योजकता कौशल्य, सृजनशील विचार, भावनिक आणि मानसिक आरोग्य, सेवा, योगा आणि ध्यान या मुलतत्त्वांना धरून उपक्रगम, यिन संवाद घेण्याकरिता परवानगी.

**गौरव वाळिंबे**
बातमीदार तथा उपसंपादक
दैनिक सकाळ नांदेड

**चंद्रकांत गंदेवार**
यिन अधिकारी,
सकाळ माध्यम समूह, नांदेड.